REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2021

# अन्नपूर्णा स्तोत्रांचे भावसौन्दर्य
## (प.प. श्रीमदवासुदेवानन्द सरस्वती विरचित स्तोत्रादि संग्रहातील स्तोत्रांच्या सन्दर्भात )

**प्रा. रेवा कुलकर्णी**
**संस्कृत विभाग प्रमुख,**
**द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.**

परमादरणीय प्रातःस्मरणीय परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामिमहाराजांची स्तोत्र रचना ही काव्यसंसारातील एक अद्भुतव आव्हानात्मक काव्य रचना आहे. काव्यप्रकाशकार मम्मटांनी अर्थांचे वाच्य, लक्ष्य व व्यंग्य असे तीन प्रकार सांगितले. ते प्रकाशित करणाऱ्या शब्दांचेही तीन प्रकार सांगितले – वाचक, लाक्षणिक आणि व्यंजक. यानंतर ते म्हणतात की काव्यासाठी 'सर्वेषां प्रायशोऽर्थानां व्यंजकत्वमपीष्यते |'[1] सर्व अर्थांचाही व्यंग्यार्थ असला पाहिजे. अर्थात वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ यांनीही व्यंग्यार्थ दिला पाहिजे, तेव्हाच ते उत्तम काव्य म्हणून गणले जाते. आपण पाण्यामध्ये एखादा खडा टाकावा आणि एक तरंग उठावा ; त्या तरंगाने दुसरा तरंग उठवावा, त्याने तिसरा....... याप्रमाणे तरंग जसे उठावे तसे शब्दांनी एक अर्थ दिल्यावर त्या अर्थाने असे अनेक अर्थ उठवावे ; तेव्हा ते उत्तम काव्य म्हणून गणले जाते.

स्वामिमहाराजांची स्तोत्ररचना हे उत्तम काव्य आहे. ते जरी दत्तसमर्पितवाणी असले तरीही सरस्वती, अन्नपूर्णा, रेणुका, विविधा नद्या आदींची स्तोत्रेही प्रातिभ व प्रासादिक आहेत. स्तोत्रांचा मुख्य विषय स्तुति असतो. ही स्तुति विविध विशेषणांद्वारा केली जाते. म्हणजेच कवीला व्यक्त होण्यासाठी इथे खूपच मर्यादा आहे . त्यामुळे अश्या ठिकाणी उत्तम काव्य करण्यासाठी कवीचे कसब पणाला लागते. स्वामिमहाराजांच्या रचनेत हे कसब अगदी सहजतेने अवतरलेले दिसते. उदाहरणादाखल आपण अन्नपूर्णास्तोत्र पाहू. स्तोत्रादिसंग्रहामध्ये १६ श्लोकांचे हे मनोरम स्तोत्र आहे.

**श्री अन्नपूर्णा स्तोत्रम्**
**श्रीदेवि दर्शनीयेंऽशा ऐं द्राद्या अंबिके तव |**
**भव्ये दत्ताभये ताभि –ह्रींबीजेन नतानव ||१||**[2]

[1] काव्यप्रकाश उल्लास २.८

[2] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१

**अर्थ –** हे अत्यंत सुंदर असणाऱ्या देवी अंबिके , इंद्रादि देवता तुझे अंश आहेत. हे विशाले, अभय देणाऱ्या देवि त्यांनी ( देवतांनी ) नत केलेल्यांचे ( त्या देवतांच्या भक्तांचेही ) –हींबीजाने रक्षण कर .

या ठिकाणी सर्व देवता अन्नपूर्णेचेच अंश असल्याने 'आकाशात् पतितम् तोयं यथा गच्छति सागरम्' या नुसार अंततो गत्वा सर्व अंबिकेचेच भक्त आहेत. तेव्हा त्यांनाही पावन करावे असे आर्जव येथे आहे.

**गत्यै मात्रे नमस्तेस्तु श्रींगायै पूर्णसंविदे |**
**वस मे योगिनि स्वान्ते क्लींमयेऽर्णेश्वरेश्वरि ||२||**[3]

**अर्थ -** परम गतिरूप असणाऱ्या श्रीं, असे जिचे गान केले जाते अश्या पूर्ण ज्ञानरूप असणाऱ्या माते तुला नमस्कार असो. हे अर्णेश्वराच्या ईश्वरी, क्लींरूप असणाऱ्या योगिनी, माझ्या अन्तः करणात निवास कर.

**दक्षे सहस्रवक्त्रस्ते न वेत्ति सकलान्गुनान् |**
**वदेत्को रिः (इ)ष्टदे सर्वान् मोक्षसंदात्रि ते गुणान् ||३||**[4]

**अर्थ -** हे नित्य सावध असणाऱ्या देवि, हजार मुखाचा शेष देखिल तुझे सर्वच्या सर्व गुण जाणू शकत नाही. साहजिकच आहे. हे मोक्ष दायिनी देवी, तुझ्या सर्व गुणांचे वर्णन कोण करू शकणार?

ही देवी मोक्षदायिनी आहे . मोक्षावस्था म्हणजे 'यतो वाचो निवर्तन्ते' अशी अवस्था ! त्रिगुणातीत , इंद्रियातीत अवस्था ! मग अश्या स्थितीत वाणीने वर्णन करणे कसे शक्य आहे.

**धूताद्ये कृपया पाहि भगवत् पूज्यपादुके |**
**तमः पूष्णा इवाविद्या गतापर्णे तवेक्षणात् ||४||**[5]

**अर्थ -** धूत म्हणजे स्वच्छ हे आपण जाणतो. पण इथे ही स्वच्छता अन्तःकरणांचे मलरहित असणे ही आहे. अन्तःकरण कामक्रोधादि षड्रिपूंनी मलिन होते. ही मलिनता त्रिगुणांच्या मर्यदित असणाऱ्यांनाच येवू शकते. जे त्रिगुणातीत असतात किंवा योग, ताप आदि मार्गांनी त्या अवस्थेला प्राप्त करतात, त्या सर्वांचीही ती आद्य-मुख्य आहे. म्हणून स्वामिमहाराज म्हणतात हे पावनांमध्ये मुख्य असणाऱ्या, देवतांना जिथे चरण पूजनीय आहेत अश्या देवी तू मला करुणेने पहा आणि तिच्या दृष्टीचा परिणामही ते उत्प्रेक्षा अलंकाराने सांगतात, ज्याप्रमाणे सूर्याने अंधकार घालवावा त्याप्रमाणे तुझ्या दृष्टीपाताने माझी अविद्या निघून गेली , नाहीशी झाली .

---

[3] स्तोत्रादिसङ्ग्रह: ५०.२

[4] स्तोत्रादिसङ्ग्रह: ५०.३

[5] स्तोत्रादिसङ्ग्रह: ५०.४

**पतिता उद्धृतास्तेहि वरदे शंकरप्रिये |**
**दयाजन्महरा चेत्ते तिष्ठेद्धि कथमावृतिः ||५||**[6]

**अर्थ -** हे वर देणाऱ्या , शंकराची प्रिया असणाऱ्या देवि, तुझा महिमा असा आहे की, तू अनेक पतितांचा म्हणजे संसारचक्रातून सुटू न शकणाऱ्यांचा उद्धार केला आहेस. साहजिकच आहे म्हणा जिची करुणा जन्ममृत्युचक्राचा नाश करते, तेथे ' पुनरपि जननं ' कसे असणार !

**कस्ते चित्तार्तिहे वेत्ता मान्येऽमरमनोतिगे |**
**मम ज्ञानं कियत्प्राज्ञि हे शंभूप्राणवल्लभे ||६||**[7]

**अर्थ -** या श्लोकात ' चित्तार्तिहे ' असे सुंदर संबोधन आहे. आर्ति म्हणजे दुःख. चित्त म्हणजेच अंतःकरणातले दुःख ' हाति ' म्हणजे नष्ट करणारी . हिच्या उपासनेने मानसिक दुःख, आधि नाहीसे होते . अश्या सर्वांनी जिला मान दिला आहे अश्या आणि देवांच्या मन , बुद्धीला न आकळणाऱ्या देवि, तुला कोण जाणू शकतो ! मी तुझे वर्णन करू इच्छितो पण हे शंकरप्रिये, बुद्धिमती, माझे ज्ञान ते किती !

**लसद्वेदनुते द्वास्थ श्ववद्गणय मामुमे |**
**भ्रमप्रदार्थवादा येऽरिप्राया वञ्चितोस्मि तैः ||७||**[8]

**अर्थ -** भक्ताने स्वतःचा अहंभाव किती समर्पित करावा याचा नमुना म्हणजे हा श्लोक, हे वेदांच्या स्तुतीने शोभणाऱ्या उमे, तू मला दरवाजावरच्या श्वानाप्रमाणे जाण. प्रमाण, युक्ती, तर्क आदींनी भ्रम निर्माण करणाऱ्या, शत्रूप्रमाणे असणाऱ्या अर्थवादांनी मी फसवला गेलो आहे. प्रत्येक शास्त्र आपापल्या प्रमाणादींनी विविध सिद्धांत मांडतात, पण यात चैतन्याचा अभाव असल्याने चित्त समाधानी होत नाही. उलट त्रस्त होते. हाच भाव इथे व्यक्त केला आहे. अश्या भगवदशरहित कोरडे वाद करणाऱ्यांना श्वानाची उपमा दिली आहे असे वाटते. आजही विज्ञान व शोध म्हणत आपणही चैतन्य तत्वापासून कुठे दूर तर जात नाही ना याचे आत्मचिंतन हा श्लोक करवतो.

**मर्त्योर्भो य इहांबाया अंके संल्लभतेर्थितम् |**
**रक्षिता कश्च मे ह्यार्ये न तेर्भो भेदर्शिनि ||८||**[9]

[6] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.५

[7] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.६

[8] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.७

[9] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.८

**अर्थ -** जर मृत्युलोकातील अर्भकाला / बालकाला अंबेच्या मांडीवर इच्छित प्राप्त होते, तर हे ,हा माझा हा परका असा भेद न करणाऱ्या हे आर्ये तुझाच बालक असणाऱ्या माझा दूसरा कोण रक्षणकर्ता आहे.

या श्लोकामध्ये श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या जन्मवेळेची घटना उल्लिखित झालेली दिसते.

**वासनाः भुक्तिकृद्देवि पूर्णविज्ञानदायिनि |**
**सुखदे नित्यमांगल्येऽर्णेशे ध्यानमुपाविश ||९||**[10]

**अर्थ -** शमदमादि साधनसंपद् परिश्रमपूर्वक मिळवणे हे या युगात अतिकठिण आहे. त्यामुळे देवीलाच प्रार्थना केली आहे की तूच वासनांपासून म्हणजेच निरंतर उठणाऱ्या इच्छांपासून मुक्ती देणारी आहेस. तसेच पूर्ण विज्ञान देणारी म्हणजेच 'तत्त्वज्ञानात् निःश्रेयसप्राप्तिः' असे सपदि मोक्षकारणीभूत आत्म प्रत्यक्ष ज्ञान देणारी असे तिचे अनुपम वर्णन केके आहे. आणि ही अवस्था अर्थात समाधी अवस्था प्राप्त होण्यासाठी हे सुख देणाऱ्या, नित्य मंगलरूप असणाऱ्या अक्षरवर्णाच्या ईश्वरी देवि , तू ध्यानामध्ये संनिध रहा. इथे अर्थामध्ये जितकी बुडी मारावी तितका अर्थ अधिक खोलवर आहे हे जाणवल्या शिवाय रहात नाही. इथे देवीकडे कुंडलिनी शक्ती स्वरुप म्हणून पाहिलेसे वाटते. ध्यानावस्थेत ही सहस्रार चक्रात शिवाशी मिलन पावली की समाधी अवस्था प्राप्त होते. म्हणून तिचे ध्यानगत साहचर्य प्रार्थिले आहे. तीच जर आपल्या बरोबर असेल तर समाधि प्राप्त करणे काय कठीण !

**देवा अर्दितशांत्यर्थमलं ते वै त्वदीरिताः|**
**वासनागन्धो मे मास्तु मानादेरार्तिदोऽत्र यः ||१०||**[11]

**अर्थ -** योगाभ्यासामध्ये सहाय्यक म्हणून ईश्वर मानला आहे. म्हणून स्वमिमहाराज म्हणतात, तू प्रेरित केलेले देव योगपथात उठणारे रोग शमन करण्यास नक्कीच समर्थ आहेत. या जगात मान, सन्मान, उपमान इ. दुःख देणारा वासनेचा, इच्छेचा लेश देखिल मला न होवो .

**नंदिनी बलिनी ब्राह्मी भिक्षाभाग्यविवर्धिनी |**
**दयाब्धिरोजस्विनीडया लक्ष्मीस्त्वं सिद्धिरूपिणी ||११||**[12]

**अर्थ -** हे आनंद देणारी किंवा कन्यारूप असणारी , बालवती, ज्ञानरूपिणी, भिक्षेचे सौभाग्य वाढविणारी अर्थात साक्षात् अन्नपूर्णेकडून भिक्षा मागण्याचे सौभाग्य ज्याला लाभते त्याची महती काय वर्णावी ! कदाचित् म्हणूनच भगवान् शंकर नित्य भिक्षु राहिला ! हे करुणेचा सागर असणाऱ्या , ओजस्वी , पूजनीय अश्या देवी, तू सिद्धीरूप लक्ष्मीच आहेस.

[10] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.९

[11] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१०

[12] स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.११

**सत्येऽस्यं कृपांभोभिषिञ्चात्र ध्यधिपालके |**
**रक्ष्यो बालः स्वको मात्रा तत्वतोर्थं वदामि ते ||१२||**[13]

**अर्थ -** हे सत्य म्हणजेच अस्तित्व . हे अस्तित्वरूपिणी, तू अंबा म्हणजेच माता आहेस. हे बुद्धीच्या स्वामिनी देवि तू येथे तुझ्या कृपारुपी जलाचे सिंचनकर. स्वतःच्या बालकाचे रक्षण मातेने करावयाचे असते हे तत्वतः मी तुला सांगत आहे .

**स्वल्पज्ञोपि शठोऽदांतो मंदो वाऽभिमतोऽपि वा |**
**तीव्रमाशापरो वायं न चोपेक्षां शिवेऽर्हति ||१३||**[14]

**अर्थ -** हे पार्वति , अज्ञ, फसवणारा, कंजूष, मंदबुद्धी, आवडता, अत्यंत आकांक्षा असणारा असला तरीही भक्ताची उपेक्षा करणे योग्य नव्हे.

**भिया न चोक्तवान्शब्दान्देवेड्ये देहिकांक्षितम् |**
**क्षुच्छांत्यै ज्ञानभिक्षान्नं हितज्ञे हितमर्पय ||१४||**[15]

**अर्थ -** भीतीमुळे, अत्यादरामुळे मला शब्द फुटत नाहीत. पण हे देवपूज्ये, माझं इच्छित मला दे. हे हित जाणणारी, माझी क्षुधा/ इच्छा शांत व्हावी म्हणून ज्ञानरुपी अन्न भिक्षा म्हणून दे.

**कृपयाऽनस्तमितया देहि ते चरणे रतिम् |**
**तपोदे सादरं याचे हितं मे पारदे कुरु ||१५||**[16]

**अर्थ -** तपाचे फल देणा-या देवि, दयार्द्र होवून तुझ्या पदी भक्ती दे. हे पार म्हणजेच मोक्ष देणा-या देवि, मी आदरपूर्वक याचना करतो आहे. माझे हित कर.

**स्तवे तेंग ह्यशक्तं मां स्वान्ते शर्वप्रिये स्मर |**
**वर्ये वरः स एवार्थ्यो हार्दज्ञेऽतिथिवल्लभे ||१६||**[17]

13 स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१२
14 स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१३
15 स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१४
16 स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१५
17 स्तोत्रादिसङ्ग्रहः ५०.१६

**अर्थ -** हे माते, मी तुझे स्तवन करतो आहे. हे शिवप्रिये तू तुझ्या अंतःकरणात मला स्मर. हे श्रेष्ठ देवि, अतिथी प्रिय असणा-या व हृदयातले जाणणा-या देवि, हाच वर मला हवा आहे.

असे हे भक्तिलहरींनी संपन्न स्तोत्र आहे.

मन:प्रसादन अर्थाबरोबरच या स्तोत्राचे वैशिष्ट्य म्हणजे याची मंत्रगर्भता ! यामध्ये एकूण चार मंत्र आहेत.

1. प्रत्येक अर्धलीतले (श्लोकाचा अर्धा भाग) प्रथम अक्षर घेतल्यास ' श्री भगवदवधूतपदकमल भ्रमर वासुदेवानंद सरस्वती भिक्षुकृतस्तव' असा सामासिक शब्द तयार होतो. याचा अर्थ असा - श्री भगवान दत्तात्रेयांच्या चरणरुपी कमलावरील भ्रमर (रुंजी घालणार भुंगा) असणा-या वासुदेवानंदसरस्वती या परिव्राजकांनी रचलेले स्तोत्र. येथेही रूपक अलंकाराचे सौंदर्य प्रतीत होते.

2. चौथे अक्षर घेतल्यास पुढील मंत्र तयार होतो.

**दत्तात्रेयो हरिः कृष्ण उन्मत्तानंददायकः |**
**मुनिर्दिगंबरो बालः पिशाचो ज्ञानसागरः||**

या दोन्ही गुंफणांतून दत्तात्रेयांना स्मरिले आहे. अन्नपूर्णेचे स्तोत्र असले तरीही अशी गुंफण करून स्वामिमहाराज दत्तसमर्पितवाणी या आपल्या ब्रीदाचे पालन केल्याची खूण सांगत असावेत.

3. नववे अक्षर घेतले असतां पुढील मंत्र तयार होतो.

**ऐं -हीं श्रीं क्लीं नमो भगवति माहेश्वरि अन्नपूर्णे ममाभिलषितमन्नं देहि देहि स्वाहा |**

4. बारावे अक्षर घेतले असतां पुढील श्लोक तयार होतो.

**'अन्नपूर्णे सदापूर्णे शंकरप्राणवल्लभे |**
**ज्ञानवैराग्यसिध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति ||'**

यातून भौतिक अन्नरुपी नव्हे तर मोक्षसाधिका अशी ज्ञान व वैराग्याची भिक्षा मागितली आहे. स्वामिमहाराज साक्षात् दत्तावतार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून प्राप्त झालेली ही स्तोत्रे हा फक्त काव्याचा अवतार नसून ते सिद्धमंत्रच होत ! त्यांच्या मंत्रांची, स्तोत्रांची, उपासना करून अनुभूती घेणारे अनेक भक्त आहेत. मंत्र, स्तोत्र म्हणजे शब्दरूपी ऊर्जा आहे. तिचा परिणाम हा फलश्रुतीत सांगितलेला असतो.

भौतिक किंवा दृष्ट प्रयत्नांना पर्याय नाहीच. पण ' दैवं चैवात्र पंचमम् |' कष्टाचे फळ मिळण्यासाठी प्रयत्नाबरोबर दैवही अनुकूल हवेच | प्रयत्नांना दैवी शक्तीची जोड मिळाल्यास 'अधिकस्य अधिकं फलम्!' दैवी शक्तीचा इथे परिणाम कसा होतो हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.